मानधन वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक इस्मपी १४९१/[२२९/९१]सेयो-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १४ जानेवारी, १९९२

वाचा:- १] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग,
क्र. इस्मपी १०८४/७३०६/[७७३९]सेयो-२,
दिनांक ११ ऑक्टोबर १९८४

शासन निर्णय:- शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक इस्मपी १०८४/७३०६/[७७७९]सेयो-२, दिनांक ११ ऑक्टोबर १९८४ अन्वये विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये व संस्थांमधील आदिवासी उमेदवारांसाठी राखीव पदे भरण्याकरिता घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षांच्या स्वरूपा-बाबत आदिवासी उमेदवारांना माहिती देऊन त्या उत्तीर्ण होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याने प्रामुख्याने आदिवासी वस्ती असलेल्या परिसरात खास आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केन्द्रे स्थापन करण्यात आली आहेत. या केन्द्रांमधील प्रशिक्षणार्थ्यांना बहुतांश ठिकाणी वसतीगृहाची सोय नसल्याने शालांत परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना दरमहा रु. २००/- आणि पदवीधर उमेदवारांना दरमहा रु. २५०/- असे मानधन देण्यात येते. सदर प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांचे मानधन वाढविण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता असा आदेश देत आहे की, आदिवासी उमेदवारांकरिता सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रातील शालांत परीक्षा उत्तीर्ण तसेच पदवीधर प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रु. ३५५/- एवढे विद्यावेतन सन १९९१-९२ या आर्थिक वर्षापासून मंजूर करण्यात येत आहे.

३. वरील प्रस्तावास येणारा खर्च "२२३०-कामगार व सेवायोजन-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-(०८) सेवायोजन १०१ सेवायोजन सेवा-२ प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे स्थापन करणे" [२२३० ०७५५] मागणी क्र. टी-८ या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो १९९१-९२ या अर्थसंकल्पीय [पूरवणी मागणीद्वारे] मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

..२.

हा शासन निर्णय नियोजन विभाग, आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १५८५/९१/व्यय-५, दिनांक १७.११.१९९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ .कि. व. जाधव ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
सेवायोजन संचालक, महाराष्ट्र राज्य, कोकणभवन, नवी मुंबई
सेवायोजन उपसंचालक, विभागीय मुख्यालये, मुंबई, पुणे, नागपूर / नाशिक व औरंगाबाद
सर्व उपप्रादेशिक सेवायोजन अधिकारी, उपप्रादेशिक सेवायोजन कार्यालये
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता] मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२ [लेखा व अनुज्ञेयता] नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा परिक्षा] मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२ [लेखा परीक्षा] नागपूर
वित्त विभाग
नियोजन विभाग
आदिवासी विकास विभाग
कक्ष अधिकारी अर्थसं. २
शिक्षण व सेवायोजन विभाग,
निवड नस्ती सेवायोजन-२